## अग्री सोलरचा 'मिनी सोलर वॉटर हीटर'

पुण्यातील अग्री सोलर सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड या सौर ऊर्जा उत्पादने निर्मितीमधील अग्रगण्य कंपनीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधनू 'मिनी सोलर वॉटर हीटर' बाजारात आणला आहे.

छोट्या व मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे हे उत्पादन आहे. हा वॉटर हीटर ५०, ७५,. व १०० लिटर अशा तीन क्षमतेत उपलब्ध करण्यात येत असून ९ हजार ते १२ हजार रुपयादरम्यान या उत्पादमांच्या किमती आहेत,असे कंपनीचे संचालक रवि पित्ती यांनी सांगितले. पारंपरिक ऊर्जेची मर्यादित उपलब्धता,त्यांची वाढती किंमत व त्यांच्या वापरामुळे निर्माण होणारे प्रदूषण या गोष्टीसाठी सौर ऊर्जेसारख्या अपारंपारिक ऊर्जेचा वापर हाच उत्तम पर्याय आहे, अशी



अग्री सोलर सिस्टिम्स कंपनीचा 'मिनी सोलर हीटर'

सोलर वॉटर हीटिंग प्रणालीही आयएसआय दर्जा परिमाणांनुसारच बनविली जाते. नव्या मॉडेलला सौर उर्जेबरोबरच पावसाळ्यात वापरता येण्यासाठी इलेक्ट्रीकल बॅकअपची सोयही देण्यात आली आहे.

दर्जात्मक सोलर कलेक्टर्स, टफन्ड ग्लास शीटस् सर्वोच्च दर्जाचे ऊर्जासंकलन करणाऱ्या तांब्याच्या प्लेट्स, व्यवस्थित इन्सुलेशन केलेली गरम पाण्याची टाकी यासह रास्त किंमतीत उत्पादन सादर केले आहे